दि. १८/१२/२२.

१) महाराष्ट्र टाईम्स पान नं. ०८

# राज्यातील साडेसात हजार ग्रामपंचायतींसाठी आज मतदान

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



राज्यातील साडेसात हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी आज, रविवारी मतदान होत आहे. ग्रामपंचायतींच्या या निवडणुका राजकीय पक्षांच्या निवडणूक चिन्हावर लढवल्या जात नसल्या तरी या निवडणुकांमध्ये सर्वच राजकीय पक्षांनी सहभाग घेतला आहे. निवडणुकीच्या प्रचाराची संपूर्ण सूत्रे स्थानिक सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या आमदारांच्या हातात होती. त्यामुळे या निवडणुकीला राजकीय रंग चढला आहे.

गेल्या आठवड्याभरापासून या निवडणुकीचा प्रचार सुरू होता. जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी आपली ताकद पणाला लावली आहे. या निवडणुकीत आपले वर्चस्व दाखवून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही कसर सोडलेली नाही. आपल्या समर्थक आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील अधिकाधिक ग्रामपंचायती ताब्यात घेण्यासाठी जोरदार प्रचार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. उद्या, रविवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. नक्षलग्रस्त भागात दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. तर, मंगळवारी, २० डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

## ग्रामपंचायतींची जिल्हा व तालुकानिहाय संख्या

अहमदनगर - २०३, अकोला - २६६, अमरावती - २५७, औरंगाबाद - २१९, बीड - ७०४, भंडारा - ३६३, बुलडाणा - २७९, चंद्रपूर - ५९, धुळे - १२८, गडचिरोली - २७, गोंदिया - ३४८, हिंगोली - ६२, जळगाव - १४०, जालना - २६६, कोल्हापूर - ४७५, लातूर - ३५१, नागपूर - २३७, नंदुरबार - १२३, उस्मानाबाद - १६६, पालघर - ६३, परभणी - १२८, पुणे - २२१, रायगड - २४०, रत्नागिरी - २२२, सांगली - ४५२, सातारा - ३१९, सिंधुदुर्ग - ३२५, सोलापूर - १८९, ठाणे - ४२, वर्धा - ११३, वाशीम - २८७, यवतमाळ - १००, नांदेड - १८१ आणि नाशिक - १९६. एकूण - ७,७५१.

(ક) લોકસત્તા પાન નં૦૩ દિ.૧૮/૧૨/૨૨.

# राज्यपालांची हकालपट्टी करा!

## महाविकास आघाडीच्या नेत्यांची एकमुखी मागणी | महाराष्ट्र पेटून उठण्याआधी निर्णय घ्या - पवार, ठाकरे यांचा इशारा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** महापुरुषांचा अपमान करणाऱ्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची तातडीने हकालपट्टी करावी अन्यथा महाराष्ट्र पेटून उठेल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला. तर कोश्यारी यांना आपण राज्यपाल मानतच नाही, कारण केंद्रातील नेत्यांनी त्यांच्या घरी काम करणारी व्यक्ती राज्यपाल म्हणून पाठविली आहे, असा घणाघात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. शनिवारी मुंबईमध्ये निघालेल्या महाविकास आघाडीच्या मोर्चामध्ये राज्यपालांना हटविण्याची एकमुखी मागणी करण्यात आली आहे.

राज्यपाल कोश्यारी यांच्यासह भाजपच्या विविध नेत्यांनी महापुरुषांच्या विरोधात केलेली वक्तव्ये, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर भाजपशासित कर्नाटकच्या *(पान १० वर)*





मोर्चावर शिवसेनाचा पगडा | भाजपचे 'माफी मागा' आंदोलन | ठाणे बंदला संमिश्र प्रतिसाद

सविस्तर पान १०

## 'छोट्या शिवसेनेचा छोटा मोर्चा'



'तुम्हाला स्वतःचे सरकार टिकविता आले नाही, तुमच्या नाकाखालून सरकार घेऊन गेलो', असा टोला लगावत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्या 'धाकट्या' (नॅनो) शिवसेनेचा 'छोटा' (नॅनो) मोर्चा अशा शब्दांत या महामोर्चाची खिल्ली उडविली. तीन पक्ष एकत्र येऊनही गर्दी जमविता आली नाही. आमचे सरकार टिकेल आणि पुन्हा सत्तेवरही येईल, असे प्रत्युत्तर त्यांनी दिले. - सविस्तर पान १०



## बिनकामाचे काढतात मोर्चे - मुख्यमंत्री

पान १०

પાન નં. ૧૦.

# राज्यपालांची हकालपट्टी करा!

(पान ३ वरून) मुख्यमंत्र्यांनी केलेली चिथावणीखोर भाषा, महागाई, बेरोजगारी याविरोधात शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी या महाविकास आघाडीच्या घटक पक्षांबरोबरच विविध समविचारी पक्ष आणि संघटनांच्या वतीने महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. भायखळा येथील रिचर्डसन अँड क्रुडास कंपनीपासून सकाळी ११च्या सुमारास निघालेल्या हा मोर्चा छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर आल्यावर महाविकास आघाडीची सभा झाली. या सभेस शरद पवार, उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, शिवसेना नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत आदी प्रमुख नेते उपस्थित होते. मोर्चासाठी मुंबई, ठाणे जिल्ह्यांसह राज्यातील अन्य भागांतूनही मोठ्या संख्येने कार्यकर्ते दाखल झाले होते.

महाराष्ट्रातील महापुरुषांच्या कार्यांचा देशभरात आदर व गौरव होत असताना राज्यपाल मात्र त्यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्ये करीत असल्याने त्यांची हकालपट्टी लवकरात लवकर न केल्यास महाराष्ट्र पेटून उठल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देतानाच महापुरुषांबाबत अवमानकारक वक्तव्ये करणाऱ्यांना धडा शिकविला जाईल, असे शरद पवार यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान महाराष्ट्र कधीही सहन करणार नाही. मी गेल्या ५५ वर्षांत अनेक राज्यपाल पाहिले. त्यांनी महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला. पण राज्यपाल कोश्यारी सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये करीत आहेत, असे ते म्हणाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ७० वर्षांपूर्वी मुंबईत लाखोंचा मोर्चा निघाला होता. मात्र आजचा हा मोर्चा एका वेगळ्या परिस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. निपाणी, कारवारमधील जनतेकडून सातत्याने महाराष्ट्रात सहभागी होण्याची मागणी केली जात आहे. त्यांचाही विचार केला गेला पाहिजे, असे मत पवार यांनी बोलून दाखविले.

कर्नाटकसह अन्य शक्ती महाराष्ट्राचे लचके तोडून राज्याची अस्मिता आणि स्वाभिमान यांना धक्का लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना गुडघे टेकायला भाग पाडले जाईल आणि राज्याला डिवचणाऱ्यांच्या महाराष्ट्रद्रोह्यांचा राजकीय शेवट करण्याचा निर्धार उद्धव ठाकरे यांनी केला. राज्याचे प्रकल्प गुजरातला पळवून नेले जात आहेत. आम्ही सुरू केलेले प्रकल्प या सरकारने बंद केले. याविरोधात महाराष्ट्रप्रेमी एकवटले आहेत आणि या मोर्चात सामील झाले आहेत. महाविकास आघाडीचा हा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचला पाहिजे. स्वतःला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे घेऊन जाणारे म्हणविणारे तोतये हे खुर्चीसाठी लाचारी करणारे आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

③ लोकसत्ता पान नं. १० दि. १८/१२/२२



समारस्थळी व्यासपीठावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते.

# मोर्चावर शिवसेनेचाच पगडा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या वतीने शिंदे- फडणवीस सरकारच्या विरोधात मोर्चा काढण्यासाठी शिवसेनेनेच पुढाकार घेतला होता आणि प्रत्यक्षात मोर्चातही शिवसैनिकांची अधिक गर्दी दिसत होती. तुलनेत काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे अस्तित्व कमी जाणवत होते. योग्य नियोजन नसल्याने विस्कळीतपणाही अनुभवास आला. तसेच प्रचंड मोठा मोर्चा असेल, असे चित्र महाविकास आघाडीकडून रंगविण्यात आले होते; पण तेवढे काही शक्तिप्रदर्शन झाले नाही.

भायखळा येथील रिचर्डसन आणि क्रुडास या कंपनीतून मोर्चाला सुरुवात झाली. कंपनीच्या गेट क्रमांक १ मधून आत जाऊन गेट क्रमांक २ मधून बाहेर सोडण्यात येणार होता. मात्र मोर्चाच्या सुरुवातीला नियोजनामध्ये गोंधळ दिसून आला. ११ वाजता सुरू होणाऱ्या मोर्चाला १२ वाजता सुरुवात झाली. तसेच सर्व नेते एकाच वेळी न आल्याने कार्यकर्त्यांचाही गोंधळ उडाला. त्यामुळे काही कार्यकर्त्यांनी मुख्य नेत्यांशिवायच मोर्चाला सुरुवात केली. नेतेच नसल्यामुळे मोर्चा जे. जे. पुलावरून जाणार आहे की खालून हेसुद्धा अनेक कार्यकर्त्यांना माहीत नसल्याने काही कार्यकर्ते पुलाखालून निघाले तर काही कार्यकर्ते पुलावरून निघाले. त्यामुळे मोर्चाच्या सुरुवातीच्या नियोजनामध्ये गोंधळ असल्याचे दिसून आले.

'कोश्यारी हटाव, महाराष्ट्र बचाव', 'फुले, शाहू, आंबेडकरांचा सन्मान, हाच आमचा स्वाभिमान', 'अखंड महाराष्ट्र', 'प्रकल्प नेले, सीमा तोडतील हाच दिल्लीचा खुनशी खेळ', 'चंपाचा जाहीर निषेध' अशा घोषणा देत सर्व कार्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात जमत होते. या मोर्चात संभाजी ब्रिगेड, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, समाजवादी पार्टी, बहुजन रिपब्लिकन पक्ष, सोशालिस्ट पार्टी, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष- युथ रिपब्लिकन (मनोज संसारे) यांसह अनेक लहान-मोठे पक्ष या महाविकास आघाडीच्या महामोर्चात सहभागी होते. या मोर्चामध्ये विविध जातीधर्मांचे नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये मुस्लीम समाजही मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे दिसून आले.

मोर्चासाठी सुमारे अडीच हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. तसेच, आवश्यकतेच्या ठिकाणी रस्ता बंद करण्यात आला होता. पोलिसांद्वारे प्रत्येक इमारतीच्या गच्चीवरून पोलीस गस्त घालत होते.

## फोर्ट परिसरात वाहतूक कोंडी

महाविकास आघाडीकडून काढण्यात आलेल्या मोर्चाचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या समोरील भागामध्ये सभेत रूपांतर झाले. मात्र, यासाठी फोर्ट परिसरातील काही रस्त्यांवरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. मात्र सभेदरम्यान कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली. या वेळी फोर्ट परिसरात वाहतूक सुरू असलेल्या रस्त्यावर गर्दी झाल्याने या मार्गांवर वाहतूक कोंडी झालेली पाहायला मिळाली. यामध्ये महापालिका मार्ग - मेट्रो जंक्शन आणि लोकमान्य टिळक मार्ग आणि नाना जगन्नाथ शंकर रोड - प्रिन्सेस स्ट्रीट या मार्गांवर वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. महाविकास आघाडीने काढलेल्या 'हल्लाबोल' मोर्चात सामील झालेल्या पक्षांच्या रंगीबेरंगी झेंड्यांमुळे 'मोर्चा एक आणि झेंडे अनेक' असे चित्र बघायला मिळाले.

## ठाकरे कुटुंबीय मोर्चात

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, त्यांची पत्नी रश्मी ठाकरे, माजी मंत्री आदित्य ठाकरे व त्यांचे बंधू तेजस हे सारे कुटुंबीय मोर्चात सहभागी झाले होते. विशेष म्हणजे ठाकरे हे मोर्चात सहभागी होत सभास्थळापर्यंत चालत आले. रश्मी ठाकरे या पहिल्यांदाच कुठल्या आंदोलनात सहभागी झाल्याचे बघायला मिळाले.

## काही काळ कार्यकर्त्यांची रेटारेटी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे नेते अजित पवार व्यासपीठावर येत असताना, कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. त्यांना जवळून पाहण्यासाठी कार्यकर्त्यांची गर्दी व्यासपीठाच्या दिशेने सरकत होती. त्यामुळे काही काळ कार्यकर्त्यांची रेटारेटी झाली होती. त्यानंतर, पोलिसांनी कार्यकर्त्यांना मागे रेटून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.


(२)

# काम करणाऱ्यांची चर्चा, बिनकामाचे मोर्चे काढतात!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे टीकास्त्र

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** सत्ता मिळविण्यासाठी बेइमानी



कोणी केली, हे महाराष्ट्राला माहीत आहे, अशी खरमरीत टीका करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'काम करणाऱ्यांची होते चर्चा आणि बिनकामाचे काढतात मोर्चा' अशी खोचक टिप्पणी शनिवारी केली. आम्ही वेगाने काम करीत आहे, याची धास्ती घेऊन जे घरात होते, ते बाहेर रस्त्यावर आले, याचा आनंद आहे, असा टोलाही मुख्यमंत्री शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी महामोर्चामध्ये भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना सरकारवर जोरदार टीका केली होती. त्याला मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. शिंदे म्हणाले, खुर्ची मिळविण्यासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडून कोणी काय केले, हे सर्वांनी पाहिले आहे. हिंदू देव-देवतांचा अपमान करणारे त्यांच्या व्यासपीठावर होते, हे आपले दुर्दैव आहे. आम्ही काम करीत असल्याचे पाहून त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.हे सरकार एक महिन्यात पडेल, असे भाकीत काहींनी वर्तविले होते; पण आता पाच महिने झाले असून हे सरकार मजबूत आहे. हे सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करून पुन्हा निवडून येईल.

तीनही पक्षांनी एवढी मेहनत घेतली, अनेक बैठका घेऊन तयारी केली होती. तरीही या मोर्चाला किती यश मिळाले, हे आपल्याला दिसले आहे. सत्ता गेल्याने हताश झालेल्यांनी पुन्हा तीच भाषणे केली आणि आरोप-प्रत्यारोप करण्याची चढाओढही होती. मुंबईत भगवा झेंड्यापेक्षा इतर झेंडेही जास्त दिसत होते. त्यामुळे शिवसेना कार्यकर्ते शिंदे गटात प्रवेश करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे आम्ही वेगाने निर्णय घेत आहोत आणि ते सरकार पाडण्याचे मुहूर्तावर मुहूर्त काढत आहेत, अशी टीका शिंदे यांनी केली

दि. ३१/१२/२२.

(५) लोकसत्ता पा.१ नं.१०

# तुमच्या नाकाखालून सरकार घेऊन गेलो!

## देवेंद्र फडणवीस यांचा आघाडीला टोला; 'छोट्या शिवसेनेचा छोटासा मोर्चा'

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** स्वतःचे सरकार टिकविता आले नाही, तुमच्या नाकाखालून सरकार घेऊन गेलो, असा टोला लगावत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्या 'धाकट्या' (नॅनो) शिवसेनेचा 'छोटा' (नॅनो) मोर्चा अशा शब्दांत खिल्ली उडविली.

तीन पक्ष एकत्र येऊनही गर्दी जमविता आली नाही. आमचे सरकार टिकेल आणि पुन्हा सत्तेवरही येईल, असे प्रत्युत्तरही फडणवीस यांनी दिले. देवदेवता, संत आणि वारकरी संप्रदायाला शिव्या देणाऱ्या आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म कुठे व कधी झाला, हे माहीत नसणाऱ्यांचा आजचा मोर्चा होता, असा आरोप फडणवीस यांनी केला. महाविकास आघाडीच्या मोर्चासंदर्भात बोलताना फडणवीस म्हणाले, उद्धव ठाकरे यांचा पक्ष जसा लहान होत आहे, तसा हा मोर्चा होता. हे कोणत्या तोंडाने मोर्चा काढत आहेत. महापुरुषांचा अपमान करणे योग्य नसून तसे कोणीही करू नये, अशी स्पष्ट भूमिका आम्ही कायम घेतली आहे. त्यामुळे केवळ राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न होत असून मुद्दे संपले की मोर्चे काढले जात आहेत. स्वा. सावरकरांचा अपमान काँग्रेसकडून अनेकदा करण्यात आला, तेव्हा शिवसेना कोठे होती? महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा काही



हे सरकार आल्यावर सुरू झालेला वाद नाही. तो वर्षानुवर्षे सुरू आहे, हे महाविकास आघाडीतील तीन पक्ष विसरले आहेत. सीमाप्रश्नाला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसही तेवढेच जबाबदार आहे, या बहुजन विकास आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांच्या विधानाशी मी सहमत आहे. सीमाप्रश्न काँग्रेसने निर्माण केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे आराध्य कालही होते, आजही आहेत आणि उद्याही राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### 'राहुल गांधींच्या विधानाचे आश्चर्य'

राहुल गांधी आणि पाकिस्तान एकाच दिवशी कसे बोलतात, हाच प्रश्न मला पडला आहे. राष्ट्राबाबत त्यांच्या संवेदना काय आहेत, हे यातून लक्षात येते. जगाने दहशतवादी राष्ट्र ठरविलेल्या पाकिस्तानकडून झालेल्या वक्तव्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही, पण राहुल गांधींच्या विधानाचे आश्चर्य वाटते. चीनने जेव्हा भारतीय भूभाग बळकावला, तेव्हा गांधी कुटुंब सत्तेत होते. देशात आज मोदी सरकार सत्तेत असून देशाची एक इंचही जमीन अन्य कोणाकडे जाऊ शकत नाही. आमच्या सैन्याने शूरपणे त्यांचा मुकाबला केला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

### उद्धव ठाकरेंची जुनीच 'कॅसेट'

उद्धव ठाकरेंनी मुंबई तोडण्याच्या केलेल्या आरोपांबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, त्यांची कॅसेट गेल्या १० वर्षांपासून वारंवार तेथेच अडकत आहे. नवीन मुद्दे सुचविण्यासाठी त्यांनी नवीन लोक नेमावेत. भारताचे संविधान सर्वोच्च असून मुंबई महाराष्ट्रापासून कोणीही तोडू शकत नाही. उद्धव ठाकरे यांच्या भाषणात कोणताही नवीन मुद्दा नसून जुनीच ध्वनिफीत (कॅसेट) वाजविण्यात आली आहे. मोर्चात तीन पक्ष एकत्र येऊनही पुरेशी गर्दी नसल्याने प्रसिद्धीमाध्यमांना 'ड्रोन शॉट' दाखविता आले नाहीत, 'क्लोज शॉट' दाखवावे लागले. आम्ही महाविकास आघाडीच्या नेत्यांना आझाद मैदान घेण्याची विनंती केली होती, मात्र त्यांनी मुद्दाम एका चिंचोळ्या जागेची मागणी केली आणि मोर्चा काढला. आझाद मैदानाचा एक कोपराही त्यांना भरता आला नसता, असा टोलाही फडणवीस यांनी लगावला.

दि. १७/१२/२२.

(६) लोकसत्ता पान नं. १०

# भाजपकडून राज्यभरात 'माफी मागा' आंदोलन

## पंतप्रधानांबाबतच्या वक्तव्यावरून पाकिस्तानचाही निषेध

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**




**मुंबई :** महाविकास आघाडीतील नेत्यांनी हिंदू देवदेवता, संत, महापुरुष यांच्यासंदर्भात वादग्रस्त वक्तव्ये केल्याने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माफी मागावी, यासाठी मुंबई भाजपने शनिवारी मुंबईसह राज्यात सहाशेहून अधिक ठिकाणी आंदोलन केले. तर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्ये केल्याने त्यांचाही निषेध करीत अनेक ठिकाणी पाकिस्तानचा झेंडा जाळण्यात आला.

शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी हिंदू देव-देवता आणि महापुरुषांबाबत अवमानास्पद वक्तव्ये केली असून खासदार संजय राऊत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळाबाबत वाद निर्माण केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांविरोधात आणि पाकिस्तानविरोधात भाजपने राज्यभरात आंदोलने केली. मुंबईत कांदिवली रेल्वेस्थानक, अंधेरी पूर्व रेल्वेस्थानक, घाटकोपर पूर्व, दादर पूर्व रेल्वेस्थानक, भाजप प्रदेश कार्यालयाजवळ, स्वा. सावरकर पुतळा, विलेपार्ले या ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत निदर्शने केली. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात वारकरी दिंड्याही सहभागी झाल्या होत्या. मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार मनोज कोटक, विधान परिषद गट नेते प्रवीण दरेकर, मुंबई भाजप प्रभारी आमदार अतुल भातखळकर, अमित साटम, कालिदास कोळंबकर, मनिषा चौधरी, योगेश सागर, सुनील राणे आदींसह अनेक भाजप नेते व पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते.

संत, हिंदू देव-देवता व स्वातंत्र्यवीरांचा अपमान करणाऱ्या ठाकरे गटाविरोधातील असंतोष शनिवारी राज्यभरात प्रकट झाला. राज्यात सुमारे सहाशेहून अधिक ठिकाणी भाजपतर्फे आयोजित ' माफी मांगो ' आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सांगितले.

(७) सकाळ मुं. पान नं. ०३.

# गावठी पिस्तूल बाळगणाऱ्याला अटक

## आरोपीवर तुळिंज पोलिस ठाण्यात आठ गुन्हे दाखल

नालासोपारा, ता. १७ (बातमीदार) : अमली पदार्थ आणि गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगार नालासोपाऱ्यात अटक करण्यात गुन्हे कक्ष शाखा दोन वसईच्या पथकाला यश आले आहे. या आरोपीवर एकट्या तुळिंज पोलिस ठाण्यात आठ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. पूर्ववैमनस्यातून या आरोपीने उत्तर प्रदेशातून गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे आणली असल्याचे तपासात उघड झाले आहे.

रामचंद्र लालचंद गुप्ता उर्फ राजू बैल (३४) असे या आरोपीचे नाव आहे. तो नालासोपारा पूर्व मोरगाव नाका या परिसरात पोलिसांची गस्त सुरू असताना पोलिसांना पाहून लपण्याचा प्रयत्न करीत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. तेव्हा त्याची अंगझडती घेतली असता दहा लाख रुपये किमतीचे १०० ग्रॅम एमडी, ७१ हजारांचे एक गावठी पिस्तूल आणि ११ जिवंत काडतुसे आढळली आहेत. याबाबत तुळिंज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली.

आरोपीची कसून चौकशी केली असता याच आरोपीवर १४ फेब्रुवारी २०२१ रोजी नालासोपारा पूर्वेकडील एका बारमध्ये बाबूआ उर्फ चंद्रशेखर रामसागर गुप्ता याने आपल्या सहा साथीदारांसह तीन गोळ्या झाडल्या होत्या. तसेच डोक्यावर, उजव्या हातावर धारदार हत्याराने वार करून फरारी झाले होते. याच गुन्ह्यातील आरोपींचा बदला घेण्यासाठी त्याने हे गावठी पिस्तूल आणले असल्याचे तपासात उघड झाले. या प्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे तुळिंज पोलिसांनी सांगितले.

SAKAL READER'S CONNECT INITIATIVE

दि. १८/१२/२२.

(५) पुढारी पान नं. ०८

# लॉटरीच्या नावाखाली ऑनलाईन जुगार चालविणाऱ्यांना अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमीरा पोलीस ठाणे पथकाने सरकारी अधिकृत लॉटरीच्या नावाखाली कोणतीही नोंदणी किंवा वैध परवान्याशिवाय ऑनलाईन जुगार खेळणाऱ्या एका रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली ऑनलाईन जुगार चालविणाऱ्यांना तिघांना काशिमिरा पोलिसांनी अटक केली आहे.

काशिमिरा येथील अनिल म्हात्रे चाळ, हनुमान मंदिराजवळ, पेणकरपाडा परिसरात ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली जुगार खेळविला जात असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार काशिमिरा पोलीस पथकाने एका सदनिकेवर छापा टाकला. यावेळी प्रदिप वढेरा आणि नितेश कन्हैया सिंग या दोन ऑपरेटरना घटनास्थळावरून अटक करण्यात आली, तर यातील मुख्य आरोपी संजय विश्वकर्मा याला शुक्रवारी ताब्यात घेण्यात आले. तेथे तीन महिन्यापासून ऑनलाईन लॉटरी खेळविली जात होती. या लॉटरीचे नाव डॉट ११ असे आहे. ही लॉटरी सकाळी साडेआठ ते रात्री दहा वाजेपर्यंत चालते. प्रत्येक १५ मिनिटांनी सिंगल- आणि डबल-अंकी या लॉटरीचा निकाल लागत असतो. एक जोडी आकड्यावर १० रुपये लावल्यानंतर लावलेला आकडा आल्यास ९०० रुपये दिले जातात. आरोपी हे स्वतः हाताने नंबर लिहून देत असलेल्या चिठ्ठीदेखील मिळून आली आहे. पोलिसांनी जुगार अड्ड्यावरून संगणक, प्रिंटरसह जुगाराच्या साहित्यासह वापरलेली उपकरणे जप्त केली. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(६) पुढारी पान नं. ०८.

## उत्तनमध्ये गावठी दारुची भट्टी उद्ध्वस्त

**मिरारोड :** उत्तन येथील धावगी परिसरातील जंगलात सुरू असलेली गावठी दारूची भट्टी पोलिसांनी उद्ध्वस्त केली. सहायक पोलिस निरीक्षक महेश मानोरे यांच्या पथकाने धावगी येथील दाट जंगलात सुरू असलेली ही भट्टी शोधून काढली. भट्टीतून धूर येऊन त्याची माहिती पोलिसांना कळू नये, यासाठी भट्टीसाठी लाकडांऐवजी एलपीजी गॅसचा वापर केला जात होता. पोलीस आल्याचा सुगावा लागताच भट्टी चालविणारे दोघेजण पळून गेले. त्या दोघांची ओळख पटविण्यात आली असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. गावठी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य यावेळी जप्त करण्यात आले आहे. अशाच प्रकारच्या अवैध दारू भट्ट्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांचे पथक सतर्क राहणार आहेत.

दि. ३१/१२/२२

(१०) पुढारी पान नं.०८

# नाट्यगृह धोरणाच्या कचाट्यात अडकवून स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला ठोकले टाळे

## मनमानी कारभाराविरोधात रस्त्यावर उतरण्याचा भाजपचा इशारा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका प्रशासनाने साकारलेल्या नाट्यगृहाचे लोकार्पण ११ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर प्रशासनाने या नाट्यगृहाच्या परिचलनाचे धोरण तत्कालीन महासभेच्या मंजूर ठरावानुसार अद्यापही अमलात आणलेले नाही. उलट हे नाट्यगृह त्याचे बांधकाम करणाऱ्या विकासकाला चालविण्यासाठी देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात असल्याने त्याला भाजपने तीव्र विरोध दर्शविला आहे. तसेच शहरातील एकमेव स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स चालविणाऱ्या ठेकेदाराला मुदतवाढ न देता अथवा नवीन ठेकेदाराची नियुक्ती न करता त्याला प्रशासनाने परस्पर टाळे ठोकून शहरातील क्रीडापटूंना वंचित ठेवले आहे. या दोन्ही वास्तू प्रशासनाने लवकर खुल्या न केल्यास भाजप रस्त्यावर उतरेल, असा इशारा भाजपचे



माजी आ. नरेंद्र मेहता यांनी दिला आहे.

पालिकेने दहिसर चेकनाका येथील सुविधा भूखंडावर साकारलेल्या एकमेव नाट्यगृहाला तत्कालीन महासभेत एपीजे अब्दुल कलाम हे नाव देण्याचा ठराव मंजूर केला होता. पालिकेतील सत्तेची मुदत संपुष्टात आल्यानंतर पालिकेचा कारभार आयुक्तांच्या हाती आला. त्यांनी नाट्यगृहाच्या नामकरणाचा मंजूर ठराव रद्द करण्यासाठी शासनाकडे न पाठविता परस्पर त्याला भारतरत्न स्व. लता मंगेशकर यांचे नाव देण्याचा ठराव तत्कालीन प्रशासकीय बैठकीत मंजूर केला. ही प्रथा नियमबाह्य असतानाच हे नाट्यगृह चालविण्याचा तसेच त्याचे भाडे निश्चितीचा ठरावदेखील तत्कालीन महासभेत मंजूर करण्यात आला असताना हे नाट्यगृह त्याचे बांधकाम करणाऱ्या विकासकाला चालविण्यासाठी देण्याचा प्रयत्न प्रशासन करीत असल्याचा आरोप मेहता यांनी केला आहे.

प्रशासनाच्या या प्रयत्नांना मेहता यांनी तीव्र विरोध दर्शविला असून हे नाट्यगृह त्यातील निश्चित भाडे आकारणीसह तत्काळ सुरु करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच खासदार निधीतून पालिकेने भाईंदर पूर्वेस साकारलेले शहरातील एकमेव स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स बाह्यस्रोताद्वारे चालविण्याचे धोरण तत्कालीन महासभेत मंजूर करण्यात आले. यानुसार हे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स खाजगी संस्थेकडून चालविण्यात येत असताना त्यात ठेकेदाराने स्वतःचे हॉटेल सुरु केले. काही महिन्यांपूर्वी त्याचा ठेका संपुष्टात आला. मुदत संपण्यापूर्वीच प्रशासनाने नवीन ठेकेदाराची नियुक्ती करणे अपेक्षित होते.

### जुन्याच ठेकेदाराला मुदतवाढ देणे अपेक्षित

स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स चालविणाऱ्या ठेकेदारालाच नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देणे अपेक्षित होते. मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करून स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला परस्पर टाळे ठोकले. यामुळे शहरातील क्रीडापटू स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सपासून वंचित राहिले असून हे कॉम्प्लेक्स प्रशासनाने तात्काळ सुरू करावे. तसेच नाट्यगृहदेखील विकासकाला चालविण्यासाठी न देता ते तत्कालीन महासभेतील निश्चित धोरणानुसार त्वरीत सुरु करण्यात यावे, अशी मागणी मेहता यांनी केली आहे. तसे न केल्यास भाजप रस्त्यावर उतरेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

(११) लोकमत पान नं.०२

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

नालासोपारा : डोंगरी पाडा येथे राहणाऱ्या १२ वर्षांच्या मुलाचे शुक्रवारी अपहरण झाले. सकाळी शाळेत जाण्यासाठी घरातून बाहेर पडला. तो घरी न आल्याने वडिलांनी पारोळ नाक्यावरील सीसीटीव्ही तपासले. तो बॅग आणि टिफिन घेऊन जाताना दिसला.

(१२) लोकमत पान नं.०२

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार

नालासोपारा : नालासोपाऱ्यात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर आरोपीने बलात्कार केल्याची घटना उघड झाली आहे. १६ जून २०२१ ते १४ डिसेंबर २०२२ यादरम्यान आरोपीने पीडितेशी शारीरिक संबंध ठेवल्याने गर्भधारणा होऊन तिने मुलीला जन्म दिला. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

दि. १८/१२/२२

(१३) लोकमत पृ. पान नं. ०२

# पोलिसांच्या १९६ पदांसाठी ७४ हजार अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या शिपाई व वाहन चालक, अशा १९६ पदांच्या भरतीसाठी तब्बल ७४ हजार ४५८ इच्छुकांचे अर्ज आले आहेत.

२०२० पासून सुरू झालेल्या मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी तीन हजार ३३१ पदे अधिकारी व कर्मचाऱ्यांची मंजूर आहेत. त्यापैकी दोन हजार २६७ पदे भरली आहेत. तब्बल एक हजार ६४ पदे रिक्त आहेत. टक्केवारीनुसार मंजूर पदांपैकी ६३ टक्के पोलिस बळ उपलब्ध असून, ३७ टक्के पोलिस बळ कमी आहे. पर्याय म्हणून महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे जवान पोलिस ताफ्यात घेण्यात आले आहेत.

पोलिस बळाची आयुक्तालयास गरज असल्याने शिपाई व वाहन चालक यांच्या १९६ पदांची भरती करण्यास प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. इच्छुकांना पोलिस भरतीसाठी अर्ज करण्याकरिता १५ डिसेंबर २०२२ पर्यंतची मुदत होती. १५ डिसेंबरपर्यंत पोलिस शिपाई पदांसाठी ६० हजार ९८१ तरुणांचे, तर १२ हजार २३२ तरुणींचे अर्ज आले आहेत. पोलिस वाहन चालक पदांसाठी एक हजार १९६ तरुणांनी, तर ४१ तरुणींनी अर्ज केले आहेत.

पोलिस भरतीसाठी अर्ज केलेल्यांची शारीरिक चाचणी होणार आहे. त्यानंतर लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. भाईंदर पश्चिमेतील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व भाईंदर पूर्वेच्या खाडी किनारी जैसल पार्क येथील मैदानाचा वापर केला जाणार आहे.

(१४) लोकमत पृ. पान नं. ०२

# दिल्ली, मेरठच्या चार मोबाइलचोरांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मोबाइलचे कव्हर गिफ्ट देतो सांगून त्यात काचेचा तुकडा टाकून लोकांचे मोबाइल हिसकावणाऱ्या चौघांना काशिमीरा पोलिसांनी अटक केली आहे. मेरठ व दिल्लीचे हे आरोपी असून, आतापर्यंत १२ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. आरोपींकडून विविध कंपन्यांचे २८ मोबाइल फोन व गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी असा पाच लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ते मेरठ व दिल्लीवरून यायचे आणि शहरात लॉजमध्ये राहायचे. चोरी केल्यानंतर ते गावी पळायचे, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय हजारे यांनी दिली.

मुन्शी कम्पाउंड येथील पेट्रोलपंपाजवळच्या रस्त्यावर मोहम्मद नूर मोहम्मद खान यांना एका व्यक्तीने मोबाइल दुकान कुठे आहे, अशी विचारणा केली. नूर यांना बोलण्यात गुंतवून मोबाइल कव्हर देतो सांगून त्यांचा मोबाइल हातचलाखीने लंपास केला आणि त्यांना कव्हरमध्ये काचेचा तुकडा टाकून दिला होता. त्यानंतर ती व्यक्ती आपल्या साथीदारासोबत दुचाकीवरून पळून गेला होता. याप्रकरणी दि. १० डिसेंबरला काशिमीरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. यानंतर पोलिस पथकाने तपास सुरू करून सीसीटीव्ही फुटेज आणि खबऱ्यांच्या मदतीने आरोपींचा शोध सुरू केला. या गुन्ह्यातील चारही आरोपी कुर्ला येथे सापडले. सोनू मलिक, दानिश जाहीद मलिक, मोहमद साजीद अब्दुल कादीर राजपूत हे आरोपी उत्तर प्रदेशच्या मेरठ, तर सागर विनोद वर्मा हा नवी दिल्लीच्या शहादरा येथे राहणारा आहे.

## मुंबई पोलिसांनीही केली होती अटक

आरोपींनी काशिमीरा पोलिस ठाणे हद्दीत पाच, नवघरला दोन, तर मीरारोडचे नयानगर, भाईंदर, पेल्हार, खडकपाडा व मुंबईच्या गोवंडी पोलिस ठाणे हद्दीत प्रत्येकी १ असे १२ गुन्हे केल्याचे तपासात उघड झाले आहेत. याआधी मुंबई पोलिसांनी त्यांना अटक केली होती.

दि. १८/१२/२२.

(७५) पुण्यनगरी पुरवणी पान नं. ०४

# नागरी समस्यांची दखल न घेतल्यामुळे काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

**।मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील पेनकरपाडा परिसरातील नागरिकांच्या अनेक समस्या आहेत. या समस्या सोडवण्यासाठी महापालिकेला अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही कोणतीही दखल घेत नसल्यामुळे महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार काँग्रेसचे प्रदेश जनरल सेक्रेटरी नवनाथ पवार यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

महापालिका शाळा, सार्वजनिक शौचालयाची दुरवस्था, स्ट्रीट लाईट, भाजी मंडई, रस्ता डांबरीकरण, वृक्षछाटणी याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा संबंधित विभाग दखल घेत नसल्यामुळे विद्यार्थी आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार काँग्रेसचे प्रदेश जनरल सेक्रेटरी नवनाथ पवार यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. महापालिका आयुक्तांना पवार यांनी दिलेल्या निवेदनात पेणकर पाडा येथील मनपा शाळा क्र. १४ च्या दुरुस्ती करण्याबाबत तसेच याच भागातील सात ठिकाणी स्ट्रीट लाईटचे खांब बदलून मोठे खांब बसवण्यात यावेत, फेरीवाल्यांसाठी भाजी मंडई निर्मिती करणे, रस्ता डांबरीकरण करणे, तसेच काही ठिकाणी रस्त्याची उंची कमी-जास्त झालेली आहे. ती एकसारखी करणे, आठ सार्वजानिक शौचालयची दुरुस्ती करणे, पेणकरपाडा, अजित पॅलेस व सागर हॉटेल, पांडुरंग वाडी, हटकेश, कनकिया या भागातली वृक्षांची छाटणी करणे, यासाठी अनेकवेळा पत्रव्यवहार केला आहे; परंतु अत्यावश्यक गरज असूनही दुरुस्तीचे कामे केली जात नाहीत. याबाबत प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे सर्व रखडलेली कामे आठ दिवसांत सुरू करण्याचे आदेश संबंधित विभागांना द्यावेत अन्यथा उपोषणाला बसण्याशिवाय पर्याय नाही, असा इशारा नवनाथ पवार यांनी महापालिका आयुक्त यांना दिला आहे.